RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक १२९(१०)] शुक्रवार, सप्टेंबर १३, २०१९/भाद्र २२, शके १९४१ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३३७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, चौथा मजला (मुख्य इमारत) मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ सप्टेंबर २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमसीओ-२०१८/प्र.क्र.२६/नवि-१४.— महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (महा. १९६५ चा ४०) चे कलम ३२१ चे पोट-कलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कलम ३२१ चे पोट-कलम (३) चे तरतुदीनुसार यापूर्वी पूर्व प्रसिद्ध केलेले महाराष्ट्र नगरपरिषद आणि नगरपंचायती (विविध प्राधिकरणांच्या वित्तीय मंजुरी अधिकार आणि भत्ते याबाबतच्या मर्यादा) नियम, २०१९ खालील नियम तयार करीत आहेत :—

१. या नियमांना, " महाराष्ट्र नगरपरिषद आणि नगरपंचायती (विविध प्राधिकरणांच्या वित्तीय मंजुरी अधिकार आणि भत्ते याबाबतच्या मर्यादा) नियम, २०१९" असे म्हणावे.

२. (१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या नियमात,—

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र नगरपरिषद व नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (महा. १९६५ चा ४०) ;

(ब) "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम.

(२) या नियमांमध्ये वापरलेले परंतु उपरोक्त नियमात परिभाषित न केलेल्या शब्द व अभिव्यक्ति यांना अधिनियमामध्ये त्यांना ठरवून दिलेला संबंधित अर्थ असेल.

३. नगरपरिषद क्षेत्रातील कोणताही समारंभ, जत्रा, करमणुकीचे कार्यक्रम किंवा प्रदर्शन किंवा गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्याच्या कार्यक्रमांसह सार्वजनिक सत्कार यांच्या बाबतीतील (खर्च विहीत करण्यात येईल अशा मर्यादेत असेल तर) असा कोणताही समारंभ इत्यादींसाठी कलम ४९ चे पोट-कलम (३) मधील खंड (डब्ल्यू) अंतर्गत नगरपरिषदाच्या वर्गवारीनुसार खर्चाच्या वार्षिक मर्यादा खालील तक्त्याप्रमाणे असतील :—

| नगरपरिषदेचा वर्ग | खर्चाची मर्यादा |
|---|---|
| अ | १,५०,००० |
| ब | १,००,००० |
| क | ५०,००० |

४. अधिनियमातील कलम ६१ चे पोट-कलम (२) मधील तरतुदीनुसार अध्यक्षासह प्रत्येक परिषद सदस्यास नगरपरिषदेची सभा, स्थायी समितीच्या, विषय समितीच्या किंवा विशेष समितीच्या सभांना हजर राहण्याबाबत नगरपरिषदेकडून खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे सभा भत्ता देण्यात येईल :—

| नगरपरिषदेचा वर्ग | सभा भत्ता (प्रती सभा) | सभा भत्त्याची मासिक कमाल मर्यादा |
|---|---|---|
| अ | ४०० | २००० |
| ब | ३०० | १५०० |
| क | २०० | १००० |

५. नगरपरिषदांच्या वर्गवारीनुसार स्थायी समिती व विषय समितीचे वित्तीय मंजुरी देण्याचे अधिकार अधिनियमातील कलम ७२ नुसार खालील तक्त्यात नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असणार नाहीत :—

| नगरपरिषदेचा वर्ग | स्थायी समितीची वित्तीय मंजुरीची मर्यादा | विषय समितीची वित्तीय मंजुरीची मर्यादा |
|---|---|---|
| अ | १०,००,००० | २,००,००० |
| ब | ५,००,००० | १,००,००० |
| क | २,००,००० | ५०,००० |

६. अधिनियमातील कलम ७७ अ नुसार नगरपरिषद वर्गवारीप्रमाणे मुख्याधिका-याला खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रती वर्ष अतिथ्य भत्ता देईल :—

| नगरपरिषदेचा वर्ग | मुख्याधिका-याचा अतिथ्य भत्ता |
|---|---|
| अ | १२,००० |
| ब | ८,००० |
| क | ६,००० |

७. अधिनियमातील कलम ९३ चे पोट-कलम (२) चा खंड (क) अंतर्गत खालील तक्त्यात नमूद केलेल्या रकमेपेक्षा अधिक खर्च अंतर्भूत असेल अशी कोणतीही संविदा नगरपरिषदेने याबाबतीत अन्यथा प्राधिकृत केले नसेल तर, अनुक्रमे "अ" वर्ग, "ब" वर्ग आणि "क" वर्ग नगरपरिषदेच्या मुख्याधिका-याने नगरपरिषदेची मान्यता किंवा मंजुरी मिळाल्याशिवाय करू नये :—

| **नगरपरिषदेचा वर्ग** | **वित्तीय मर्यादा** | **वार्षिक कमाल मर्यादा** |
|---|---|---|
| अ | ३,००,००० | १०,००,००० |
| ब | २,५०,००० | ७,५०,००० |
| क | २,००,००० | ५,००,००० |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सं. श. गोखले,**
शासनाचे सहसचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, 4th Floor, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 13th September 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No.MCO-2018/C.R.26/UD-14.— In exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(2)* of section 321 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the Maharashtra Municipal Councils and Nagar Panchayats (Limits for Financial Sanctions and Allowances for Various Authorities) Rules, 2019, the same having been previously published, as required by sub-section *(3)* of said section 321, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Municipal Councils and *Nagar Panchayats* (Limits for Financial Sanctions and Allowances for Various Authorities) Rules, 2019.

2. *(1)* In these rules, unless the context requires otherwise,—

*(a)* "Act" means the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965);

*(b)* "section" means the section of the Act.

*(2)* Words and expressions used in these Rules but not defined hereinabove shall have the same meaning as respectively assigned to them under the Act.

3. The limits of expenditure per year for the class of Council under clause *(w)* of sub-section *(3)* of section 49 of the Act, for any ceremony, fair, entertainment, exhibition or public reception including those to felicitate meritorious students within the Municipal area shall be such as specified in the following table, namely :—

| Class of Council | The Limits of Expenditure in rupees |
|---|---|
| A | 1,50,000 |
| B | 1,00,000 |
| C | 50,000 |

4. A Council shall pay to each Councillor including the President a meeting allowance per meeting for attending the meetings of the Council, Standing Committee, Subject Committee or Special Committee under sub-section (*2*) of section 61 of the Act, at the rate specified in the following table, namely :—

| Class of Council | Meeting Allowance (per meeting) | Maximum Monthly Limit of meeting Allowance |
|---|---|---|
| A | 400 | 2000 |
| B | 300 | 1500 |
| C | 200 | 1000 |

5. Under section 72 of the Act, the Standing Committees and Subjects Committees of different classes of Municipal Councils shall have the power for financial sanction not exceeding the limits specified in the following table, namely :—

| Class of Council | The Limits of Financial Sanction of standing committee | The Limits of Financial Sanction of of subject committee |
|---|---|---|
| A | 10,00,000 | 2,00,000 |
| B | 5,00,000 | 1,00,000 |
| C | 2,00,000 | 50,000 |

6. Under section 77A of the Act, the Council shall grant to its Chief Officer a sumptuary allowance per year at the rate specified in the following table, namely :—

| Class of Council | Sumptuary allowance to Chief Officers |
|---|---|
| A | 12,000 per year |
| B | 8,000 per year |
| C | 6,000 per year |

7. Under clause *(c)* of sub-section (*2*) of section 93 of the Act, no contract which will involve an expenditure exceeding the amount specified in the following table shall be made by the Chief Officer of 'A' Class, 'B' Class and 'C' Class Council, respectively, unless otherwise authorised in this behalf by the Council, except with the approval or sanction of the Council, namely :—

| Class of Council | The Limits of sanction | Yearly maximum limits |
|---|---|---|
| A | 3,00,000 | 10,00,000 |
| B | 2,50,000 | 7,50,000 |
| C | 2,00,000 | 5,00,000 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. S. GOKHALE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.